# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ३१/२०२०** | **दिनांक १७/०४/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ११/०४/२०२० ते १७/०४/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १८/०४/२०१९ सकाळी ८:३० पासून २२/०४/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११/०४ | १२/०४ | १३/०४ | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | १७/०४ | | १८/०४ | १९/०४ | २०/०४ | २१/०४ | २२/०४ |
| ० | ० | ० | ० | ० | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | २ | ० | ० |
| ३४.० | ३४.६ | ३५.० | ३४.४ | ३५.६ | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३५ | ३६ | ३५ | ३४ | ३५ |
| २२.२ | २३.० | २४.० | २३.८ | २४.६ | - | - | किमान तापमान (अं.से) | २७ | २६ | २९ | २७ | २७ |
| ० | ० | ० | ० | ० | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | २ | २ | १ | १ |
| ८५ | ८४ | ८१ | ९० | ८३ | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६४ | ५१ | ५२ | ५१ | ४९ |
| ५० | ५० | ६२ | ५० | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | २५ | २३ | २२ | २५ | २३ |
| ३.९ | ३.७ | ३.४ | ३.० | ३.७ | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ३ | ५ | ३ | ४ | ३ |
| शांत | वा. | वा. | शांत | ई. | - | - | वाऱ्याची दिशा | नै.द. | द. | पू. | पू. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ४२३३.४ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २० एप्रिल २०२० दरम्यान हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून कमाल व किमान तापमानात वाढ संभवते तसेच आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **कोविड १९ बाबत शेतकऱ्यांनी घ्यावयाची दक्षता** | | • कोरोना विषाणूचा संसर्ग प्रतिबंधित करण्यासाठी शेतीतील कामे करताना स्वच्छता व सुरक्षिततेच्या खबरदारीच्या उपाययोजनांचे पालन करावे.<br>• शेतीतील सर्व कामे करताना शेतकऱ्यांनी / शेतमजुरांनी तोंडाला मास्क लावावे तसेच एकमेकांमध्ये ४-६ फुट अंतर राहील याची दक्षता घ्यावी. ठराविक वेळाने साबणाने हात स्वच्छ धुवावेत.<br>• जेवताना, विश्रांती घेताना, शेतमाल गाडीत चढवत तसेच उतरवत असताना दोन व्यक्तींमध्ये ४-६ फूट अंतर राहील असे पहावे. शेतात काम करतांना कामगारांची जास्त गर्दी होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• कोविड -१९ चा संसर्ग आढळून आलेल्या भागामध्ये शक्यतो शेतीमध्ये यंत्राचा वापर केल्यानंतर १ टक्का सोडियम हायपोक्लोराईड या निर्जंतुकाचा वापर करून यंत्रे निर्जंतुक करून ठेवावी तसेच शेतमाल साठवून ठेवायच्या गोण्या व इतर साहित्य वापरण्यापूर्वी १ टक्का सोडियम हायपोक्लोराईडचे द्रावण वापरून निर्जंतुक करून घेणे आवश्यक आहे.<br>• पिक संरक्षण व पोषक अन्नद्रव्यासंदर्भात फवारणी करताना उपकरणे हाताळणे, द्रावण तयार करणे, फवारणी करणे व उपकरणे धुवून ठेवणे याविषयी पुरेशी खबरदारी घ्यावी.<br>• शेतीसाठी आवश्यक खरेदी आणि विक्री करताना शासनाने नेमून दिलेल्या नियमांचे पालन करावे. |
| **उन्हाळी भात** | **फुलोरा ते दाणे भरणे अवस्था** | • उन्हाळी भात पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने शेतात पाण्याची पातळी ५ सें. मी. पर्यत ठेवावी. |
| **आंबा** | **फळधारणा अवस्था** | • दिनांक २० एप्रिल २०२० रोजी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने आंबा फळांचे पाऊसापासून संरक्षण करण्यासाठी अंडाकृती आकाराच्या आंबा फळांना कागदी/ वर्तमानपत्रापासून बनविलेल्या पिशव्यांचे आवरण घालावे. आवरण घालताना फळाच्या देठाकडे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले "रक्षक फळमाशी सापळा" प्रती हेक्टरी ४ या प्रमाणात बागेमध्ये झाडाच्या खालील बाजूच्या फांद्यावर लावावेत. फळमाशीच्या सापळ्यात ठेवलेले रासायनिक खाद्य आमिष (मिथाईल युजेनोल) ६ ते ७ आठवड्यानंतर बदलावे. फळगळ झालेली आंबा फळे गोळा करून नष्ट करावी व बागेत स्वच्छता ठेवावी.<br>• नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी. पहिल्या वर्षी आठवडयातून दोन वेळा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून दोन वेळा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून दोन वेळा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• आंबा नवीन लागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये साफ सफाई करून घ्यावी. |
| **काजू** | **फळधारणा अवस्था** | • दिनांक २० एप्रिल २०२० दरम्यान हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने पूर्ण तयार झालेल्या काजू बियांची काढणी पाऊसाचा अंदाज घेवून करावी. काढणी केलेल्या बिया उन्हामध्ये ७ ते ८ दिवस वाळवून हवाबंद ठिकाणी साठवणूक करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना दर आठ दिवसांनी प्रती कलम १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी. तसेच कलमांच्या आळ्यातील पाण्याचे बाष्पीभवन कमी होण्यासाठी आळ्यामध्ये वाळलेले गवत, पालापाचोळा किंवा पोलीथीनचे आच्छादन करावे.<br>• काजूमध्ये रोठा या किडीचा (खोडकिडीचा) प्रादुर्भाव झाडाचे खोड व उघडी मुळे यावर दिसून येण्याची शक्यता असल्याने रोठ्याची कीड झाडाची साल पोखरून आतील गाभा खाते. रोठयाच्या प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी १५ एम. एम. पटाशीच्या सहाय्याने प्रादुर्भित साल कडून झाडातील रोठयाला बाहेर काढून मारुन टाकावेत व प्रवाही क्लोरपायरीफॉस २० टक्के ५० मि. ली. प्रती १० लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग द्रावणाने चांगला भिजवावा. झाडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये व इजा झाल्यास त्याला बोर्डो पेस्ट लावून जखम झाकावी.<br>• काजू नवीन लागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये साफ सफाई करून घ्यावी. |
| **नारळ** | - | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने नारळ बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच तसेच आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. नवीन लागवड केलेल्या नारळाच्या रोपांची कडक उन्हामुळे पाने करपू नयेत म्हणून रोपांना वरून सावली करावी. |
| **चिकू** | **फुलोरा ते फळधारणा** | • तापमानात वाढ व आर्द्रतेत घट संभवत असल्याने चिकू बागेस ५ ते ६ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे. |
| **दुभती जनावरे** | - | • जनावरांच्या शरीराचे तापमान संतुलित राहण्यासाठी जनावरांना ताजे स्वच्छ व थंड पाणी मुबलक प्रमाणात देण्यात यावे तसेच उष्णतेचा दाह कमी करण्यासाठी वैरणीवर १ टक्के गुळपाणी आणि ०.५ टक्के मीठ यांचे स्वतंत्र द्रावण करून शिंपडावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी गोठ्याचे शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने गोठयाच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे.<br>• उष्णतेपासून जनावरांचे संरक्षण करण्याकरिता दुपारच्या वेळी जनावरांच्या अंगावर थंड पाणी शिंपडावे त्यामुळे शरीराचे तापमान कमी होण्यास मदत होईल. |
| **कुकुटपालन** | - | • कुकुटपालन शेड मध्ये पाण्याची भांडी वाढवावी व पिण्यासाठी स्वच्छ आणि थंड पाण्याची मुबलक प्रमाणात देण्यात यावे. तसेच खाद्य सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळेस देण्यात यावे.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी कुकुटपालन शेडचे छप्पर गवत, भाताचा पेंडा, किंवा नारळाच्या झावळ्या यांनी झाकून त्यावर अतिउन्हाच्यावेळी पाणी पडेल अशी व्यवस्था करावी तसेच वारा वाहत असलेल्या दिशेने शेडच्या बाजूस पाण्यात भिजवलेले बारदान किंवा गोणपाट बांधावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**